प्रकरण सहा

# उपसंहार

## प्रकरण सहा

# उपसंहार

मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्यांचा अभ्यास, त्याची वैशिष्ट्ये व वेगळेपण शोधण्याच्या हेतूने प्रस्तुत अभ्यास केलेला आहे. मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्या अधिक वैशिष्ट्यपूर्ण आहेत. लघुकादंबरी या वाङमयप्रकारामध्ये मोहन पाटील यांनी निश्चितच मोलाचे योगदान दिले आहे. मोहन पाटील यांच्या 'पाचुंदा' तील 'कोंडमारा', 'फुलपाखरु', 'लिगाड', 'खांदेपालट', 'बस्तान' या पाच लघुकादंबऱ्यांच्या अनुषंगाने प्रस्तुत अभ्यास केला आहे.

मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्यांचा अभ्यास त्यांची वैशिष्ट्यपूर्णता व वेगळेपणा दाखविण्यासाठी या लघुकादंबऱ्यातील आशयसूत्रे, वातावरण आणि व्यक्तिरेखा, भाषाशैली आणि अन्य वैशिष्ट्ये या अंगांनी अभ्यास केला आहे. या अभ्यासाची मांडणी करताना मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्यांचे वेगळेपण स्पष्ट करण्यासाठी 'लघुकादंबरी' चे स्वरुप आणि वाटचाल तसेच ग्रामीण साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा आणि स्वरुप यांचा अभ्यास होणे आवश्यक होते. म्हणून त्याचा पहिल्या प्रकरणात विचार करण्यात आलेला आहे. मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्यांचा अभ्यास, आशयसूत्रे, वातावरण, व्यक्तिरेखा, भाषाशैली आणि अन्य वैशिष्ट्यांचा विचार प्रकरण दोन, तीन, चार आणि पाच मध्ये केला आहे. या अभ्यासातून आलेले निष्कर्ष प्रस्तुत उपसंहार या सहाव्या प्रकरणात मांडलेले आहेत.

मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्यांच्या अभ्यासास सुरुवात करण्यापूर्वी 'लघुकादंरबरीचे' स्वरुप आणि वाटचाल, तसेच ग्रामीण साहित्य निर्मितीच्या प्रेरणा आणि स्वरुप याचा पहिल्या प्रकरणात विचार केला आहे. लघुकादंबरी हा गद्य कथात्म साहित्याचा एक स्फुट प्रकर असला तरी कथा व कादंबरी या दोन प्रकारापेक्षा लघुकादंबरीचे स्वरुप भिन्न आहे. लघुकथा आणि दिर्घकथा हे दोन प्रकार जवळचे नाते सांगणारे असतील तर लघुकादंबरी आणि कादंबरी हे ही एकत्र बसणारे प्रकार आहेत. कादंबरीप्रमाणेच लघुकादंबरीतही काल, अवकाश यांच्या संयोजनाला विशेष महत्व प्राप्त झालेले आहे.

काळ आणि अवकाश या घटकांची वैशिष्ट्यपूर्णता लघुकादंबरीच्या संरचनेच्या, व्यक्तिरेखा, व्यक्तिचित्रण, भाषा, कथानक अशा प्रत्येक घटकाच्या विशिष्ट रुपावर आणि या घटकांच्या परस्पर संबंधावर परिणाम करते. लघुकादंबरी हा कथात्म वाङमय प्रकार असून या वाङमय प्रकाराची पाळेमुळे आपणास लोकसाहित्यातील आख्यानकाव्यात शोधता येतील. छोटा अवकाश आणि आशयसूत्रांच्या मर्यादा लक्षात घेता आपल्या लोकसाहित्यातील 'कथाकाव्य' या प्रकाराशी लघुकादंबरीचे साधर्म्य आढळते. मराठीत 'लघुकादंबरी' हा वाङमय प्रकार आता पुरेसा रुढ झाला आहे असे म्हणता येईल. डॉ. ल.म. भिंगारे यांनी आपल्या 'हरिभाऊ' या संशोधनपर ग्रंथात हरिभाऊ आपटे यांच्या 'काळ तर मोठा कठिण आला' या दिर्घकथेस 'लघुकादंबरी' म्हणता येईल असे नमूद केले आहे. तर व्यंकटेश माडगूळकरांच्या 'बनगरवाडी' चा निर्देश भालचंद्र नेमाडे 'लघुकादंबरी' मध्ये करतात. गेल्या चार-पाच दशकात गौरी देशपांडे, कमल देसाई, आनंद पाटील, वसंत आबाजी डहाके, रोहिणी कुलकर्णी अशा अनेक महत्वाच्या लेखकांनी लघुकादंबरी हा प्रकार पुरेशा गांभीर्याने हाताळला आहे. मोहन पाटील यांनीही आपल्या लघुकादंबऱ्यातून ग्रामीण वास्तवाचे चित्रण मांडले व ग्रामीण साहित्याला एक वेगळे आयाम मिळवून दिले. एकूणच मोहन पाटील यांचे लघुकादंबरीलेखन महत्वपूर्ण आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये आपण मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्यातील आशयसूत्रांचे वैशिष्ट्य पाहिले आहे. त्यांच्या लघुकादंबऱ्यांची खास अशी वैशिष्ट्ये आहेत. दुसऱ्या प्रकरणात आलेली आशयसूत्रे म्हणजे बदलते ग्रामीण जीवन, ग्रामीण राजकारणाचे बदलते संदर्भ, शेतकऱ्याचे दारिद्रय आणि शोषण, घट्ट होत जाणारी जातीव्यवस्था, स्त्रीजीवन, ग्रामीण माणसाची अगतिकता, शेतीचे बदलते स्वरुप, शेतीतील यांत्रिकीकरणातून निर्माण झालेल्या समस्या अशी अनेक आशयसूत्रे विचारात घेत्यानंतर या आशयसूत्रांचे काही विशेष समोर येतात त्याचे विवेचन सार पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१. मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्यात आशयसूत्रांची विविधता आहे.
२. लेखक या आशयसूत्रांची निवड वास्तवातून करीत असल्यामुळे आशयसूत्रांना संपन्नता प्राप्त होते. या आशयसूत्रांतून लेखक समकालीन वास्तवाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करतो.

३. आशयसूत्रांचे वैविध्य आणि व्यापक जीवनदर्शनाचा आवाका यामुळे मोहन पाटील यांच्या लघुकादंबरीचे वेगळेपण अधिक ठसठशित होते.

मोहन पाटील यांच्या लघुकादंबरीतील वातावरण, व्यक्तिरेखाचित्रण आणि भाषाशैलीच्यादृष्टीने वेगळेपण या पुढील दोन प्रकरणातून आपण पाहिलेले आहे.

तिसऱ्या प्रकरणात मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्यातील वातावरणनिर्मिती आणि व्यक्तिरेखांचा विस्तृतपणे अभ्यास केला आहे. पाटील यांच्या लघुकादंबऱ्यात महाराष्ट्र कर्नाटक या सीमाभागातील ग्रामीण परिसाराचे चित्रण येते. हा परिसर त्यांच्या कथानकाला अधिक सकस आणि उठाव मिळवून देतो. पाटील यांच्या निवेदनांतून येणारा तपशिल कथानकाला अधिक ठळक करुन टाकतो. त्याबरोबरच मोहन पाटील यांच्या व्यक्तिचित्रणात अनेक थरातील, पंथातील, जातीपातींचे स्त्री पुरुष अशी विविधता दिसून येते. त्यांच्या लघुकादंबऱ्यातून चित्रित झालेला ग्रामीण माणूस हा कष्टाळू आहे. त्याबरोबरच सत्तापिपासू, लबाड व बेरकी आणि चंगळवादी प्रवृत्तीच्या पुरुषांचेही चित्रण येते. मोहन पाटील आपल्या लघुकादंबऱ्यातून विविधांगी स्त्री जीवनाचे चित्रण करतात. या स्त्रीजीवन चित्रणाला पाटील यांचा वास्तव अनुभवांचा स्पर्श आहे म्हणून ही स्त्रीचित्रे गडदपणे वाचकासमोर प्रकट होतात. खानदाणीपणा, सामाजिक प्रतिष्ठा पुरुषसत्ताक पध्दती अशा अनेक गोष्टींना या स्त्रिया बळी पडतात. एकुणच भारतीय संस्कृतीत स्त्रीच्या उपेक्षितपणावर मोहन पाटील प्रकाश टाकतात.

चौथ्या प्रकरणामध्ये आपण मोहन पाटील यांच्या लघुकादंबऱ्यातील भाषाशैलीच्या गुणवैशिष्ट्यांचा अभ्यास केला. पाटलांची भाषाशैली ही सरळ साधी आहे. त्यात कृत्रिमता दिसत नाही. मोहन पाटील यांची भाषाशैली ही खास त्यांची शैली आहे. विशेष करुन महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागात बोलल्या जाणाऱ्या मराठी बोलीभाषेचा वापर हे या भाषाशैलीचे ठळक वैशिष्ट्य सांगता येते. कानडी वळणाने मराठीत आलेल्या वाक्प्रचारांचा, म्हणींचा वापर त्यांच्या लेखनात सर्रासपणे झालेला दिसतो. ग्रामीण जीवनाशी निगडित असणाऱ्या शब्दांचा वापर, निवेदनातील चित्रमयता, खटकेबाज संवाद, व्यक्तिरेखांची मानसिक आंदोलने टिपण्यातील कौशल्ये इत्यादी गोष्टीमुळे त्यांचे साहित्य सजग बनत जाते.

काहीवेळा ढोबळ व्यक्तिचित्रणे त्यांच्या लेखनाला मर्यादा आणताना दिसतात. असे असुनही मोहन पाटील यांच्या लेखनाची भाषाशैली अधिकाधिक प्रयोगशीलतेकडे झुकणारी आणि मराठी ग्रामीण साहित्यात सवतासुभा निर्माण करणारी आहे असे निश्चितच म्हणता येते.

पाचव्या प्रकरणात मोहन पाटील यांच्या लघुकादंबरीतील अन्य वैशिष्ट्यांचा विचार केला आहे. मोहन पाटील १९८० नंतरचे लेखक आहेत. त्यांच्या लघुकादंबऱ्यातून झपाट्याने बदलत जाणाऱ्या ग्रामीण जीवनाचा वेध घेतला गेला. राजकारण, जागतिकीकरण, आर्थिक सुबत्ता, विज्ञानयुग, यांत्रिकीकरण आणि फोफावत जाणारा चंगळवाद. यामुळे ग्रामीण संवेदन पूर्णपणे बदलले. गांव बदलले तसा गावगाडाही बदलला. पूर्वापार चालत आलेली खेड्यातील जगण्याची रीत व आर्थिक व्यवस्था असणारी बलुतेदारी पद्धत मोडकळीस आली.

या सगळ्या अभ्यासातून मोहन पाटील यांच्या लघुकादंबरीचे वेगळेपण लक्षात येते. या वेगळेपणातच या लघुकादंबरीच्या वाङ्मयीन श्रेष्ठतेची वैशिष्ट्ये सापडतात. एकूणच १९८० नंतरच्या मराठी ग्रामीण साहित्याचा विचार करता, आशय आणि अभिव्यक्ति, भाषा आणि शैली याबाबतीत मोहन पाटील यांची लघुकादंबरी वेगळी असल्याचा प्रत्यय येतो. साचेबंद आशयसूत्रात अडकलेल्या मराठी लघुकादंबरीला आशयसूत्रांचे वैविध्य ही लघुकादंबरी देते. मोहन पाटील आशयसूत्रांची निवड वास्तवातून करीत असल्यामुळे आशयसूत्रांना संपन्नता प्राप्त होते. या आशयसूत्रांतून हा लेखक समकालीन वास्तवाचा ग्रामीण अनुभव, जाणिवा आणि संवेदनशिलता प्रकट करणारी असली तरी ती तेथेच थांबत नाही तर मानवाच्या मुलभूत शोकात्मक परिस्थितीचा आणि नियतीचा शोध ती घेते. मोहन पाटलांचे लेखन स्थलकालाच्या संदर्भाच्या पलीकडे जाऊन शाश्वत सत्याचा शोध घेऊ पाहते. मोहन पाटलांचे लघुकादंबरी लेखन मूळ भारतीय परंपरेशी नाते सांगते. हे लेखन सामाजिक, राजकीय, पर्यावरणात गुदमरुन टाकणाऱ्या अनुभवांना चिंतनाच्या पातळीवर घेऊन जाते.

# संदर्भग्रंथ सूची

## अभ्यासग्रंथ सूची

पाटील मोहन, 'पाचुंदा', पुणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन, प्रथम आवृत्ती, २००२.

## संदर्भग्रंथ सूची

१. आत्रे, त्रि. ना. '*गावगाडा*', पुणे, वरदा प्रकाशन, तिसरे पुनर्मुद्रण. २००९.

२. कदम महेंद्र, '*कादंबरी : सार आणि विस्तार*', कोल्हापूर आक्षरदीप प्रकाशन, २००७.

३. कुलकर्णी अ. रा., '*शिवकालीन महाराष्ट्र*' पुणे, राजहंस प्रकाशन, २००४.

४. कुलकर्णी द. भि., '*पर्थिवतेचे उदयास्त*', मुंबई, पॉप्यूलर प्रकाशन, १९७७.

५. कोतापल्ले नागनाथ, '*साहित्याचा अवकाश*', पुणे, प्रतिमा प्रकाशन, २००३.

६. कोसंबी डी. डी., '*प्रचीन भारतीय संस्कृती आणि सभ्यता*', पुणे, डायमंड पब्लिकेशन, २००६.

७. गणोरकर प्रभा, वसंत डहाके, (संपा.), '*वाङ:मयीन संज्ञा : संकल्पना कोश*', मुंबई, भटकळ प्रकाशन, २००३.

८. गोखले अरविंद, '*कथोपासक*', मुंबई, दिलीप प्रकाशन, १९९१.

९. घवी रविंद्र आणि इतर (संपा.), 'प्रदक्षिणा खंड-II', पुणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन, १९९१.

१०. जाधव मनोहर, (संपा.), '*समीक्षेतील नव्या संकल्पना*', औरंगाबाद स्वरुप प्रकाशन, २००१.

११. जोग रा. श्री. व इतर, (संपा.), 'प्रदक्षिणा खंड -I' पुणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन, १९४१.

१२. जोशी सुधा, '*कथा : संकल्पना आणि समीक्षा*', मुंबई, मौज प्रकाशन, २०००.

१३. डॉ. ठाकुर रविंद्र, '*साहित्य : समीक्षा आणि संवाद*', पुणे, दिलीपराज प्रकाशन, १९९९.

१४. थोरात हरिश्चंद्र, '*कादंबरी विषयी*' पुणे, पद्मगंधा प्रकाशन, २००६.

१५. नमाडे भालचंद्र, '*साहित्याची भाषा*', औरंगाबाद, साकेत प्रकाशन, १९८७.

१६. पठारे रंगनाथ, '*सत्वाची भाषा*', श्रीरामपुर, शब्दालय प्रकाशन, १९९७.

१७. पवार गो. मा. व हातकंणगलेकर म. द. (संपा.), '*निवडक मराठी समीक्षा*', नवी दिल्ली, साहित्य अकॅडमी, १९९९

१८. पवार गो. मा. व हातकंणगलेकर म. द. (संपा.), '*मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरुप*', मुंबई, पॉप्यूलर प्रकाशन, १९८६.

१९. पाटणकर रा. भा., '*कमल देसाई यांचे कथाविश्व*', मुंबई, मौज प्रकाशन, १९८४.

२०. पाटील मृणालिनी व इतर (संपा.), '*समकालीन साहित्य : प्रवृत्ती आणि प्रवाह*', नागपूर, विजय प्रकाशन, १९८५.

२१. पाटील मोहन, '*ग्रामीण साहित्य आणि संस्कृती*', औरंगाबाद, स्वरुप प्रकाशन, २००८.

२२. फडके भालचंद्र (संपा.), '*सहा कथाकार*', पुणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन, १९७५.

२३. बापट, गोडबोले, '*मराठी कादंबरी तंत्र आणि विकास*', पुणे, व्हिनस प्रकाशन, १९९३.

२४. बोराडे रा. रं., '*ग्रामीण साहित्य*', औरंगाबाद, साकेत प्रकाशन, १९९२.

२५. भागवत श्री. पु. व इतर (संपा.), '*साहित्य : अध्यापन आणि प्रकार*', मुंबई, पॉप्यूलर प्रकाशन, १९८७.

२६. भोसले द. ता., '*ग्रामीण साहित्य : एक चिंतन*', पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९८८.

२७. भोळे भा. ल., '*साहित्य प्रत्यय*', औरंगाबाद, स्वरुप प्रकाशन, २००१.

२८. माडगूळकर अंबादास, खंडेकर सुर्यकांत, '*मराठी ग्रामीण कथा*', पुणे, लेखन वाचन भांडार, १९६७.

२९. यादव आनंद, '*ग्रामसंस्कृती : दशा आणि दिशा*', पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, २०००.

३०. यादव आनंद, '*ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या*' पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९८४.

३१. शहाणे अशोक, '*नपेक्षा*', मुंबई, लोकवाङ:मय गृह, २००५.

३२. शेवडे इंदुमती, '*मराठी कथा : उद्गम आणि विकास*', मुंबई, सोमैय्या पब्लिकेशन प्रायव्हेट लिमिटेड, १९७३.

३३. सारंग विलास, '*सिसिफस आणि बेलाक्वा*', मुंबई, प्रास प्रकाशन, १९०४.

३४. हातकणंगलेकर म. द., '*वाङ:मयीन शैली आणि तंत्रं*', कोल्हापूर, अभिजात प्रकाशन, १९८१.

## नियतकालिके

१. परिवर्तनाचा वाटसरु, दिवाळी, २००८.

२. लेख, दाभोळकर नरेंद्र, 'हिरकपूर्ती अनिसची', दै. सकाळ, सप्तरंग, दिनांक १८ एप्रिल २०१०.

# परिशिष्टे

टीप: लघुकादंबरीच्या शीर्षकाचे संक्षिप्त रूप परिशिष्टात याप्रमाणे वापरले आहे.

१. कोंडमारा - कों ; २. लिगाड - लि , ३. खांदेपालट - खां;
४. फुलपाखरू - फु ; ५. बस्तान - ब.

# परिशिष्ट १
## ग्रामीण शब्दांची यादी

मोहन पाटील 'पाचुंदा' या लघुकादंबरी संग्रहातून ग्रामीणवातावरणाचे दर्शन घडवितात. ज्यात नैसर्गिकपणा आणण्यासाठी ग्रामीण शब्दांचा वापर करतात. त्यातील काही निवडक ग्रामीण शब्द खालीलप्रमाणे.

१) ढिगला - रास, चवड (कों. पृ. १)

२) दावं - कासरा गुरांच्या गळ्यात बांधण्याची दोरी (को. पृ. २)

३) येडबडला - गोंधळला (को. पृ. २)

४) गडप - गायब, बेपत्ता (कों. पृ. २)

५) गुमान - शांतपणे (कों. पृ. ४)

६) झंपर -ब्लाऊज (कों. पृ. ४)

७) गमजा - गंमत (कों. पृ. ४)

८) घुंमरी -हुज्जत (कों. पृ. ५)

९) वघळ - ओघळ, पाणंद (कों. पृ. ८)

१०) टांवळणे - उरकणे (कों. पृ. ९)

११) रग्गड - पुष्कळ, विपुल (कों. पृ. ९)

१२) बातरी - हुशार, चलाख (कों. पृ. ११)

१३) अल्लादी - अलगद (कों. पृ. १५)

१४) औत - नांगरणी (कों. पृ. १५)

१५) मंगळणे - लाडीगोडी लावणे (कों. पृ. १५)

१६) दुमला - दुमडलेला, घडी पडलेला (कों. पृ. १६)

१७) पतरी - पसरट, पातळ (कों. पृ. १५)

१८) भगुलं - पातेलं (कों. पृ. १६)

१९) फाळी - पसरट धुण्याचा दगड (कों. पृ. १७)

२०) चार जापत्याचं घर - चार खोल्याचं घर (कों. पृ. २०)

२२) गद - अडी, खाच (कों. पृ. २१)

२३) चान्नं - चांदणं (कों. पृ. १४)

२४) पष्ट - स्पष्ट(कों. पृ. १४)

२५) गुद्याडून - धडपडून (कों. पृ. १५)

२६) जुप्पी - तयारी (फु. पृ. २४)

२७) आळमटळम - टाळाटाळ (फु. पृ. २४)

२८) खळणी - धुणे, स्वच्छ करणे (फु. पृ. २४)

२९) ब्याद - लटांबर (फु. पृ. २५)

३०) मुळकांड - ऊसाचे मूळ(फु. पृ. २६)

३१) भगुणं - पातेले, भांडे (फु. पृ. २७)

३२) भाद्दर - बहादूर (फु. पृ. २८)

३३) जांपात - तंद्रीत (फु. पृ. २१)

३४) गडदम - गाढ (फु. पृ. ३४)

३५) घुलवून - फसवून (फु. पृ. ३४)

३६) बोजा - ओझे (फु. पृ. ३४)

३७) एकासवंन - एकसारखे (फु. पृ. ३६)

३८) बैजवार - व्यवस्थित, नीट (फु. पृ. ४६)

३९) दागदर - डॉक्टर (फु. पृ. ४६)

४०) आवंदा - यंदा (फु. पृ. ४८)

४१) जित्राब - झाड, रोप (लि, पृ. ५५)

४२) इसकटणे - पसरणे, विस्कटणे (लि, पृ. ५५)

४३) बायकांचा पुट्ठा - बायकांचा गट (लि, पृ. ५५)

४४) घामाट निघणे - दरदरून घाम सुटणे (लि, पृ. ५५)

४५) मर्दानिशा - मर्दा (लि, पृ. ५६)

४६) दांङगपट्टा – दांटपट्टा (लि, पृ. ५६)

४७) आवंड – चाकोरी (लि, पृ. ५७)

४८) उनाळसारी – उन्हाळ्यात (लि, पृ. ५७)

४९) एवढ्यापावटी – यावेळी (लि, पृ. ५९)

५०) इतकिंदो – इतक्यात (लि, पृ. ६०)

५१) खांडपाट – शेतात पाणी सोडायचा उपपाट (लि, पृ. ६०)

५२) युगतीनं – युक्तीनं (लि, पृ. ६१)

५३) हूंदे – होऊदे (लि, पृ. ६२)

५४) हेनला – ह्याना (लि, पृ. ६२)

५५) वदळंप – चाकोरी (लि, पृ. ६७)

५६) बिंडा – वैरणीचा भारा (लि, पृ. ६७)

५७) इदरकल्याणी – वेगळी, विशिष्ट (लि, पृ. ६७)

५८) गयवर – गहिंवर (लि, पृ. ६८)

५९) गुंडगुळं – वाटोळं, वाईट (लि, पृ. ६८)

६०) उपसंपायसं – काबाडकष्ट (लि, पृ. ६८)

६१) ठकीस – टाकलेला (लि, पृ. ६९)

६२) अज्जाद – अजिबात (लि, पृ. ६९)

६३) मागिंद्या – मागे (लि, पृ. ६९)

६४) सलाया – सोप्या (लि, पृ. ७२)

६५) इचित्र – विचित्र (लिं. पृ. ७३)

६६) ढाफी – फांदी, डहाळी (लिं. पृ. ७६)

६७) कारंडी – कन्नड लोक (लिं. पृ. ७९)

६८) आंगूळ – आंघोळ (लिं. पृ. ७९)

६९) चराट – दोरी, कासरा (लिं. पृ. ७६)

७०) शिबी – आंबे उतरविण्याची जाळी लावलेली काठी (लिं. पृ. ७६)

७१) बोनी – बोनगी, भवानी, पहिली मिळकत (लिं. पृ. ७६)

७२) निलकं – वेगळं (लिं. पृ. ७६)

७३) लिगाड – झेंगाट, लचांड (लिं. पृ. ७७)

७४) अवचिताप – ऐरागैरा, अनोळखी (लिं. पृ. ७९)

७५) धाबारा – दहाबारा (लिं. पृ. ८०)

७६) कानपणे – तापणे (लिं. पृ. ८१)

७७) गौंड – गोड (लिं. पृ. ८१)

७८) चिगूर – चिलिपिली (लिं. पृ. ८१)

७९) ब्याद – बला (लिं. पृ. ८२)

८०) भाद्दर – बहादूर (अपभ्रंश) (लिं. पृ. ८५)

८१) सांच्यापारी – संध्याकाळी (लिं. पृ. ९०)

८२) चितागती – चिंताग्रस्त (लिं. पृ. ९०)

८३) उमका – उमाळा (लिं. पृ. ९०)

८४) भुटुक – खोटं (लिं. पृ. ९१)

८५) आडामढेंगं – आडमुठे (लिं. पृ. ९२)

८६) फासलने – बसणे (लिं. पृ. ९२)

८७) तलखली – तगमग (लिं. पृ. ९३)

८८) लडतर – भानगड, लडतर (लिं. पृ. ९४)

८९) घोळसाघोळशी – मारामारी (लिं. पृ. ९५)

९०) पायखूट – जनावर उधळू नये म्हणून पायात बांधलेली दोरी (लिं. पृ. ७०)

# परिशिष्ट २

## ग्रामीण वाक्प्रचार आणि म्हणी

मोहन पाटील यांनी आपले ग्रामीण साहित्य अधिक उठावदार बनविण्यासाठी, त्याला नैसर्गिकपणा देण्यासाठी ग्रामीण वाक्प्रचार आणि म्हणींचा वापर करतात. त्यातील काही वाक्प्रचार आणि म्हणी खालीलप्रमाणे.

१. वेळ गांडू लागणे – वेळ खराब लागणे (कों./२)

२. भिरमटून येणे – कटाळा येणे (कों./पृ. २)

३. पायात लांबडं येणं – पायात साप येणे (कों./पृ. २)

४. जीव भोवंडणे – चक्कर येणे, भोवळ येणे (कों./पृ. ३)

५. कवळा घालणे – आलिंगन देणे (कों./पृ. ४)

६. कानाकडनं घास देणे – लाच देणे (कों./पृ. १२)

७. ठाक देणे – फसवणूक करणे (कों./पृ.८)

८. एका लुगड्यानं बाई म्हातारी होत न्हाई – थोड्या नुकसानीने फार मोठा फरक पडत नाही. (फु. पृ. ४३)

९. आळकट-पाळकट घालून बसणे – ऐसपैस मांडी घालून बसणे (फु. पृ. २६)

१०. पिवळा करून टाकणे – लग्न लावून देणे (फु. २८)

११. बैलास्नी पाणी दावणे – बैलांना पाणी पाजवणे (फु. पृ. ३४)

१२. अंगाला घट्टं पडणे – काम करून अंग राकट होणे (लि, पृ. ५५)

१३. वांग्याचं भूत करणे – अशक्य गोष्ट करणे (लि, पृ. ७९)

१४. तोंडात मिठाची गुळणी धरणे – शांत बसणे (लि./६०)

१५. डोळं तांबरून पाहणे – रागाने पाहणे (लि./६१)

१६. मांजराच्या सुगाव्यानं उंदराची भंबेरी उडावी – मोठ्या माणसाची सामान्य माणसाला भिती वाटणे. (लि./६३)

१७. शेंडा-बुडका सांगणे – संपूर्ण हकिकत सांगणे (लि./६४)

१८. फुकटपासरी सोडणे – व्यर्थ घालवणे, वाया घालवणे (लि./६८)

१९. तोंडात राळं वाळणे – बोलून तोंड दुखणे (लि./६७)

२०. घुमटाला माकड चावणे – अशक्य गोष्ट घडणे (लि./८०)

२१. पीर पाण्यात पडणे – विषय संपणे (लि./८१)

२२. खत करणे – वठणीवर आणणे (लि.पृ. ९४)

२३. वाघाच्या घरात शेळी पावणीबाई – अशक्य गोष्ट. शक्य होणे. (लि. पृ. ९५)

२४. बैलामागं कुळप ओढणे – नियतीला शरण जाणे. (लि. पृ. ९५)

२५. बाची बाबळ बुडणे – नुकसान होणे. (खां.पृ. ११४)

२६. आरडून पोळी नि बोंबलून गुळणी – कोणतीही गोष्ट उघड उघड करणे. (खां. पृ. ११९)

२७. अण्णाबाची खीर – आयती गोष्ट. (खां. ११९)

२८. तीन अडकून सीताराम होणे – नुकसान होणे. (खां., १२३)

२९. आवगड जाग्याच दुकणं – नाजुक बाब. (खां, १२३)

३०. चटणी उडविणे – बेदम मारणे. (खां, १२८)

३१. गुडी आणि पावसाची उडी – चैत्रात पावसाची ओढ बसणे. (खां, १३०)

३२. एकानं गाय मारली म्हणून दुसऱ्यानं वासरु मारणे – एकान एक गोष्ट केली म्हणून दुसऱ्यानेही तीच गोष्ट करणे. (ब, १५०)

३३. तोंडाला पानं पुसणे – फसविणे. (ब, १५८)

३४. आडला हरी गाढवाच पाय धरी – गरजेच्यावेळी हात पसरणे. (ब, १६०)

३५. इर्षेनं गाढव खाणे – इर्षेतून अयोग्य गोष्ट करणे. (ब, १७४)

३६. ह्या बोटावरची थुकी त्या बोटावर करणे – फसगत करणे. (ब, १७८)